**सुविचार**

विचार असे मांडा कि तुमच्या विचारांवर कुणीतरी विचार केलाच पाहिजे.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 57 ■ गुरूवार, दि. 03 ऑक्टोबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




प्रभासच्या या ३ मोठ्या चित्रपटांवर आल्या या ३ रोमांचक बातम्या, चाहत्यांची मने होतील आनंदाने प्रफुल्लित

आतील पान

## आधी 'मातोश्री' मग 'वर्षा'... मध्यरात्रीनंतर अंबानी

# ठाकरे-शिंदेंना घरी जाऊन भेटले; चर्चांना उधाण!

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** प्रसिद्ध उद्योजक मुकेश अंबानींनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंची मंगळवारी रात्री 'मातोश्री' निवासस्थानी जाऊन भेट घेतली. विशेष म्हणजे या भेटीनंतर लगेच त्यांनी 'वर्षा' निवासस्थानी जाऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची भेट घेतली. रात्री एक वाजता मुकेश अंबानी वर्षा निवसस्थानी पोहोचले होते. त्यामुळेच या भेटीमागील नेमकं कारण काय याबद्दल उलट-सुलट चर्चांना उधाण आलं आहे.



रात्री साडेदहाला 'मातोश्री'वर पोहोचले

मुकेश अंबानी रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास उद्धव ठाकरेंच्या 'मातोश्री' निवासस्थानी पोहोचले. त्यांनी उद्धव ठाकरेंबरोबर सुमारे दोन तास चर्चा केली. रात्री साडेदहा ते साडेबारा दरम्यान मुकेश अंबानी आणि त्यांचे पुत्र अनंत अंबानी 'मातोश्री' निवासस्थानावर होते. दोन तासांनंतर अंबानींचा ताफा 'मातोश्री' या निवासस्थानावरुन बाहेर पडले. या भेटीदरम्यान राजकीय क्षेत्रात सक्रीय नसलेले तेजस ठाकरेही उपस्थित होते अशी माहिती समोर येत आहे.

तसेच या भेटीनंतर अंबानींचा ताफा थेट 'वर्षा' निवासस्थानी मुख्यमंत्री शिंदेंची भेट घेण्यासाठी गेला. या दोघांच्या भेटीदरम्यान अंबानींनी नेमकी काय आणि कोणत्या विषयावर चर्चा केली यासंदर्भातील माहिती समोर आली असून ती अजून गुलदस्त्यातच आहे. 'वर्षा' निवासस्थानीही अंबानी पिता-पुत्र बराच वेळ होते. त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंबरोबर महत्त्वाच्या विषयांवर चर्चा केल्याचे समजते. मात्र नेमकी कशावर चर्चा झाली हे सांगण्यात आलेलं नाही.

एका रात्रीत अंबानींनी दोन प्रमुख नेत्यांच्या भेटी घेतल्याने राज्यात काही मोठी राजकीय घडामोड घडणार की काय यासंदर्भात दबक्या आवाजामध्ये राजकीय वर्तुळात चर्चा सुरु झाली आहे. मात्र अंबानींनी उद्धव ठाकरेंबरोबर तसेच त्यानंतर एकनाथ शिंदेंबरोबर झालेल्या वेगळ्या बैठकीमध्ये काय चर्चा झाली हे स्पष्ट झालेलं नाही.

ही गाठभेट नेमकी का झाली? यामागे काही व्यवसायिक कारण आहे का? किंवा एखाद्या कार्यक्रमाचं निमंत्रण अथवा एखाद्या कार्यक्रमाची माहिती देण्यासाठी ते या दोन्ही नेत्यांच्या भेटीसाठी गेले होते का याबद्दल चर्चांना उधाण आलं आहे.

यापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक शरद पवार यांनी मध्यंतरी एका बड्या उद्योगपतीची भेट घेतल्यानंतर राज्यामध्ये सत्तापालट झाला होता. त्यामुळे आता अंबानी यांनी माजी आणि विद्यमान मुख्यमंत्र्यांची अगदी त्यांच्या निवासस्थानी जाऊन अर्ध्या तासाच्या फरकाने भेट घेतल्याने काही घडामोडी आगामी काळात घडणार का याबद्दलची चर्चा दबक्या आवाजात सुरु आहे.

# मुंबई नागपूर महामार्गावर अपघात; पिंपरी खंदारे येथील दोन जण जागीच ठार

**दैनिक आपला विदर्भ**

**■ देवानंद सानप**

**मेहकर:** ट्रक व दुचाकीच्या झालेल्या समोरासमोर धडकेत २ जण जागीच ठार झाले ही घटना २ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७ वाजता दरम्यान नागपूर मुंबई महामार्गवरील बिबी शहराजवळील चिखला फाट्यावर घडली.या अपघातात पिंपरी खंदारे येथील दोन दुचाकीस्वार जागीच ठार झाले. बंडू चौधर व दत्तात्रेय चौधर अशी मृतकाची नावे आहेत.

घटनेबाबत प्राप्त माहितीनुसार लोणार तालुक्यातील पिंपरी खंदारे येथील बंडू शिवाजी चौधर, व दत्तात्रय बाळाजी चौधर हे दोघेजण एमएच २८ एक्यू ५३५० या क्रमांकाच्या दुचाकीने बिबीवरून आपले काम आटपून पिंपरी खंदारे गावाकडे जात होते.तर मेहकरवरून जालन्याकडे जाणाऱ्या एमएच १२ टीव्ही २०६७ या क्रमांकाच्या ट्रकने चिखल्या फाट्यावर दुचाकीला जोरदार धडक दिली. या धडकेत पिंपरी खंदारे येथील दुचाकीस्वार जागीच ठार झाले. ही घटना कळताच बिबी पोलीस स्टेशनचे ठाणेदार संदीप पाटील व पोलीस कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत मदत कार्य सुरू करुन ट्राफिक सुरळीत केली. अपघात झाल्यानंतर ट्रक चालक त्या ठिकाणाहून फरार झाल्याचे प्रत्यक्ष दर्शनी लोकांनी सांगितले. वृत्त लिहीपर्यंत गुन्हा नोंद झालेला नव्हता.

## घरात लटकलेले चार मृतदेह, दरवाजा उघडताच थरकाप, शिक्षकाने आख्ख्या कुटुंबासह आयुष्य संपवलं, महाराष्ट्र हादरला!

**नागपूर/प्रतिनिधी :** राज्याच्या उपराजधानीमधून एक खळबळजनक बातमी समोर आली आहे. नागपूरच्या मोवाड येथे एकाच कुटुंबातील चौघांचे मृतदेह त्यांच्या राहत्या घरात आढळून आले आहे. विजय पचोरी असे या प्रकरणातील वडिलांचे नाव आहे. तर पत्नी बालाबाई पचोरी, गणेश पचोरी, दीपक पचोरी असे इतर मृतकांची नावे आहेत. घटनेची माहिती मिळताच पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले आहे. मात्र या घटनेने नागपूर जिल्ह्यासह राज्यात एकच खळबळ उडाली आहे.

तर या प्रकरणातील धक्कादायक बाब म्हणजे चार मृतदेहांपैकी तीन मृतदेहाचे हात पाठीमागे बांधून लटकलेल्या अवस्थेत आढळल्याने अनेक तर्क-वितर्क लावले जात आहे. तसेच प्रकरणातील वडिलांनीच तिघांच्या हत्येनंतर स्वत: आत्महत्या केल्याची शक्यता पोलिसांकडून व्यक्त केली जात आहे. मात्र, अद्याप तरी या प्रकरणामागील कारण स्पष्ट झाले नाही. पोलीस या प्रकरणाचा आता अधिक तपास करत असून तपासाअंतीच या प्रकरणामागील कारण कळू शकणार आहे.

शिक्षकानेच आख्ख्या कुटुंबासह आयुष्य संपवलं?

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, या प्रकरणातील वडील विजय पचोरी हे सेवानिवृत्त शिक्षक आहेत. दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून मुलाच्या व्यवसायातील आर्थिक तंगीमुळे कुटुंबात आधीच वाद सुरु सुरू होता. त्यामुळे या वाद अधिक विकोपाला गेला असावा आणि त्यातूनच त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलले असावे, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. मात्र दुसरीकडे प्रकरणातील चार मृतदेहांपैकी तीन मृतदेहाचे हात पाठीमागे बांधून लटकल्या अवस्थेने अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. प्रकरणातील वडिलांनीच तिघांची हत्या केली असावी आणि हत्येनंतर स्वत: आत्महत्या तर केली नाही ना? अशीही शक्यता आता वर्तविण्यात येत आहे.

मात्र, घटनेची सत्यात पोलीस तपासतूनच पुढे येणार आहे. सध्या पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

वाशिम जिल्ह्यात ४८ तासात दोन हत्या, हत्येच्या घटनेने जिल्हा हादरला!

वाशिम जिल्ह्यात काही तासात दोन वेगवेगळ्या हत्येच्या घटना घडल्या आहे. त्यामुळे हत्याच्या घटनेने वाशिम जिल्हात मोठी खळबळ माजली आहे. वाशिमच्या कारंजा तालुक्यातील शिंगणापुर इथं क्षुल्लक कारणावरून एका ३० वर्षीय युवकाचा काही तरुणांनी बेदम मारहाण केली. दरम्यान या घटनेत युवकाचा मृत्यू झाला आहे. शिवमंगल भोसले असं मृत व्यक्तीचे नाव असून या तरुणाचं वय ३० वर्ष असल्याचं कळते आहे.




## साहित्यातील मिरासदार ; द मा मिरासदार

मराठी साहित्यातील जेष्ठ साहित्यिक द. मा. मिरासदार यांचा काल म्हणजे २ ऑक्टोबर रोजी तिसरा स्मृतीदिन होता. तीन वर्षापूर्वी म्हणजे २ ऑक्टोबर २०२१ रोजी त्यांचे निधन झाले होते. त्यांच्या निधनाने मराठी साहित्यातील मिरासदारी पर्वाचा अंत झाला असेच म्हणावे लागेल. द. मा. मिरासदार हे मराठीतील प्रख्यात विनोदी लेखक व कथाकथनकार होते. १४ एप्रिल १९२७ रोजी त्यांचा जन्म झाला. द. मा मिरासदार यांचे पूर्ण नाव दत्ताराम मारुती मिरासदार असे होते मात्र ते द. मा या नावानेच प्रसिद्ध झाले. द. मा मिरासदार यांनी १९५२ साली अध्यापन क्षेत्रात प्रवेश केला. पुण्याच्या कॅम्प एज्युकेशन सोसायटीच्या शाळेत ते शिक्षक होते. त्याआधी काही काळ त्यांनी पत्रकारिताही केली. १९६२ सालापासून त्यांनी कथाकथनास सुरवात केली. द. मा मिरासदार, व्यंकटेश माडगूळकर आणि शंकर पाटील यांनी ६० च्या दशकात संपूर्ण महाराष्ट्रभर कथाकथनाचे प्रयोग केले. त्यांच्या कथाकथनाने महाराष्ट्राला अक्षरशः भुरळ घातली. द. मा मिरासदार हे विनोदी कथा सादर करायचे. त्या कथांचे लेखनही त्यांनीच केलेले असायचे. द. मा मिरासदार यांच्या भुताचा जन्म, माझ्या बापाची पेंड, व्यंकुची शिकवणी, शिवाजीचे हस्ताक्षर, माझी पहिली चोरी, हरवल्या च्या शोध या विनोदी कथा श्रोत्यांनी अक्षरशः डोक्यावर घेतल्या. द. मा. मिरासदार यांची कथा सादर करण्याची शैली खुमारदार होती. आपल्या खुमारदार शैलीत कथा सादर करत त्यांनी महाराष्ट्राला लोटपोट हसवले. द. मा. मिरासदार यांनी विपुल प्रमाणात लेखन केले. विनोदी कथा ही त्यांची खासियत होती. द. मा. मिरासदार यांचे २४ कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. याशिवाय त्यांनी १८ चित्रपटांच्या पटकथाही लिहिल्या आहेत. एक डाव भुताचा या चित्रपटाची कथा–पटकथा लेखन त्यांनी केले आहे इतकेच नाही तर या चित्रपटात त्यांनी अभिनयही केला आहे. द. मा मिरासदार यांच्या विनोदी कथा ग्रामीण जीवनावर आधारित असत. ग्रामीण जीवनातील विसंगतीचे, विक्षिप्तपणाचे, इरसालपणाचे दर्शन त्यांच्या कथांतून घडत. त्यांनी केवळ विनोदीच नाही तर स्पर्श, विरंगुळा, कोणे एके काळी यासारख्या गंभीर कथाही लिहिल्या. द. मा. मिरासदार यांच्या अनेक कथांवर चित्रपट निघाले. त्यांच्या काही कथांचा समावेश शालेय अभ्यासक्रमातही करण्यात आला. त्यांना मानाचे अनेक पुरस्कार मिळाले आहेत. त्यांच्या निधनाने मराठी साहित्य विश्र्वात जी पोकळी निर्माण झाली आहे ती कधीही भरून न निघणारी अशीच आहे. द. मा. मिरासदार यांच्या निधनाने मराठी साहित्यातील मिरासदारीच संपली आहे असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. द. मा. मिरासदार यांना विनम्र अभिवादन!

# मोर्चाच्या रूपाने शिवसेनेला पुन्हा बळकटी


## शेतकऱ्यांचा भव्य परिवर्तन मोर्चाचे आयोजन

## शिवसेना प्रति सर्वसामान्यांचा स्नेह कायम

मतदार संघातील समस्या निकाली निघाव्या, विकासासाठी मतदाराच्या संवेदना, चेतना जागृत व्हाव्या, यासाठी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाच्या वतीने गुरुवार दि. ३ ऑक्टोबर रोजी मेहकर येथील उपविभागीय कार्यालयावर भव्य मोर्चा आयोजित केला आहे. या मोर्चाला मार्गदर्शन करण्यासाठी विरोधी पक्ष नेते अंबादास दावणे, शिवसेना जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवंत, प्रा. नरेंद्र खेडेकर,धर्मवीर पुत्र प्राध्यापक आशिष रहाटे, गोपाळराव बछिरे निंबाजी पांडव, दीपक मापारी यासह शिवसेनेचे पदाधिकारी तसेच महिला पदाधिकारी यांची उपस्थिती राहणार आहे. तरी मेहकर लोणार मतदार संघातील नागरिकांनी मोठ्या संख्येने या मोर्चात सहभागी व्हावे, असे आवाहन उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे इच्छुक उमेदवार सिद्धार्थ खरात यांनी केले आहे...

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** बाळासाहेबांच्या शिवसेनेचे विभाजन झाल्यानंतर बाळासाहेब शिवसैनिक आजही मूळ शिवसेनेसोबत कायम आहेत. निष्ठावंत शिवसैनिकांनी उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेला कायम वाढविण्याचे काम करून सर्वसामान्यांना न्याय दिला आहे. त्यामुळे आजही मतदारांचे शिवसेने सोबत स्नेहाचे व आपुलकीचे संबंध घट्ट आहेत. अशातच आता उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना गटाचे इच्छुक उमेदवार सिद्धार्थ खरात यांनी दि. ३ ऑक्टोबर रोजी मेहकर येथील उपविभागीय कार्यालयावर संवेदनाचेतना जागृत मोर्चाचे आयोजन केल्याने शिवसेने पुन्हा प्रचंड उत्साह दिसून येत आहे. या मोर्चामुळे शिवसेनेने आपली ताकद कायम असल्याचे दाखवले आहे. मेहकर मतदारसंघात सिंचनाच्या अपूर्या सुविधा पाण पिण्याच्या पाण्याची अद्यापही मार्गी लागली नाही मतदार संघातील रस्त्यांची अत्यंत दुरवस झाली आहे. सर्व सामान्यांच्या हाताला काम मिळेल असा उद्योग धंदा या परिसरात नाही शिक्षणाची सुविधा नाही शेतकऱ्यांच्या मालाला योग्य दाम नाही, शेतात जाण्यासाठी रस्ते नाही आधी असंख्य समस्याने मतदार संघातील मतदार त्रस्त असताना सत्ताधारी मात्र या सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या समस्ये कडे दुर्लक्ष करीत आहे. परिणामी मायबाप असलेले शेतकरीराजा व मतदार यांच्यामध्ये प्रचंड चिड निर्माण झाली आहे. तर उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाचे इच्छुक उमेदवार सिद्धार्थ खरात यांच्या रूपाने एक उच्च विद्या विभूषित व्यक्तिमत्व सामाजिक कार्याची जाण असणारे व गोरगरिबांना नेहमी मदत करणारे नेतृत्व या मतदारसंघाला मिळाल्याने भविष्यात या मतदारसंघाचा नक्कीच कायापालट होऊन विकासाची पहाट उजाडे अशी अपेक्षा मतदारांमध्ये निर्माण झाली आहे. त्यामुळे आतापासूनच मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद हा उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाचे इच्छुक उमेदवार सिद्धार्थ खरात यांना मिळत आहे. सिद्धार्थ खरात हे शिवसेनेचे निष्ठावंत कार्यकर्ते असून शिवसेनाप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याशी तसेच युवा सेनेचे प्रमुख आदित्य ठाकरे यांच्याशी त्यांचे वरिष्ठांशी स्नेहाचे संबंध आहेत. सिद्धार्थ खरात यांची ओळख ही एक निष्ठावंत शिवसैनिक सामाजिक कार्याची जात व वर्ग विभागाला नेहमी मदत करणारे व्यक्तिमत्व म्हणून आहे. निवडणुकीपूर्वीच सिद्धार्थ खरात यांना मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याने भविष्यात मेहकर लोणार मतदार संघामध्ये पुन्हा शिवसेनेचाच उमेदवार विजयी होणार असल्याचे राजकीय वर्तुळात सुरू असलेल्या चर्चेवरून दिसून येत आहे.



## हाडांना लोखंडासारखा टणक करेल ब्लू चीज, खाण्याचे जबरदस्त फायदे

चीजमध्येही तुम्हाला अनेक प्रकार मिळतील. आज आपण निळ्या चीजबद्दल म्हणजे ब्ल्यू चीजबद्दल जाणून घेणार आहोत. यूएस डिपार्टमेंट ऑफ ॲग्रीकल्चरच्या मते, ब्लू चीजमध्ये कॅल्शियम भरपूर असते, जे निरोगी दात



आणि हाडांसाठी आवश्यक आहे. याच्या सेवनाचे इतरही अनेक आरोग्य फायदे असू शकतात. हे फायदे समजून घेऊया.

आरोग्यासाठी फायदेशीर

आहारात ब्ल्यू चीजचा समावेश करून हृदयविकाराचा धोका कमी करू शकता. सायंटिफिक वर्ल्ड जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासानुसार, जे लोक नियमितपणे ब्ल्यू चीजचे सेवन करतात त्यांना ब्ल्यू चीजचे सेवन न करणाऱ्यांच्या तुलनेत हृदयविकाराचा धोका कमी असतो.

ब्लू चीज खाल्ल्याने तुमच्या कोलेस्ट्रॉलची पातळीही कमी होते.

ब्ल्यू चीजमध्ये दाहक–विरोधी गुणधर्म आढळतात. सूज आणि वेदना कमी करण्यासाठी ब्लू चीजचे सेवन फायदेशीर मानले जाते.

ब्ल्यू चीजमध्ये फॉस्फरस देखील आढळतो, ते खाल्ल्याने हाडे आणि दात मजबूत होतात.

ब्ल्यू चीजमध्ये प्रथिने आढळतात, त्याचे सेवन केल्याने शरीराला ऊर्जा मिळते.

कॅल्शियम असल्यामुळे ब्ल्यू चीज खाल्ल्याने हाडे मजबूत होतात. अशा प्रकारे सांधेदुखीचा धोकाही कमी होतो.

ब्ल्यू चीजचे सेवन केल्यास कोलेस्ट्रॉलची पातळी नियंत्रित राहते आणि हृदयविकार कमी होतात.

ब्ल्यू चीजचे साईड इफेक्ट्स

ब्लू चीजमध्ये सोडियमचे प्रमाण जास्त असते. जर तुम्ही जास्त प्रमाणात सोडियमचे सेवन केले तर उच्च रक्तदाब, हृदयाच्या समस्या आणि सूज यासारखे आजार होऊ शकतात.

ज्या लोकांना लैक्टोज असहिष्णुता आहे त्यांना ब्लू चीज खाल्ल्यानंतर मळमळ, उलट्या, पोटदुखी आणि जुलाब यासारख्या समस्यांना तोंड द्यावे लागते.

जर तुम्हाला मोल्डची ऍलर्जी असेल तर त्यामुळे पोट खराब होऊ शकते.

ब्लू चीजमध्ये मायकोटॉक्सिन असते. याचे जास्त प्रमाणात सेवन केल्याने पोटदुखी आणि जुलाब सारख्या समस्या उद्भवू शकतात.

ब्लू चीजमध्ये चरबीचे प्रमाण जास्त असते, ते जास्त प्रमाणात खाल्ल्याने उच्च कोलेस्ट्रॉलची समस्या उद्भवू शकते.

## मुलगा पॉर्न पाहताना दिसला तर पालक म्हणून काय कराल? सर्वात आधी...

आपल्या देशात आजही सेक्स सारख्या मुद्द्यांवर आजही मोकळेपणाने बोलले जात नाही. आई–वडिलच काय तर शाळेतही याबाबत योग्य ते शिक्षण दिलं जात नाही. अशावेळी अर्धया ज्ञानामुळे मुलं या सगळ्या गोष्टींकडे आकर्षित होतात. अशावेळी पालकांनी ही परिस्थिती कशी हाताळावी हे समजून घेणे अत्यंत गरजेचे आहे. कारण पालकांना पॉर्नोग्राफीबद्दल मुलांशी बोलणे अवघडल्यासारखे वाटू शकते. मुलं आता डिजिटल जगाशी खूप लवकर जोडले जातात. एवढंच नव्हे तर त्यांना या सगळ्या गोष्टी सहज उपलब्ध होतात. अशावेळी अनेक मुलांना खूप कमी वयात पॉर्न व्हिडीओ पाहण्याची सवय लागते. तेव्हा पालकांनी ही परिस्थिती कशी हाताळावी हे समजून घेणे अत्यंत गरजेचे आहे. आज प्रत्येक मुलाकडे स्मार्ट गॅजेट्स आहेत. त्यामुळे चुकीच्या मार्गावर ही मुलं लगेच भरकटत जातात. रिसर्चनुसार मुलं किंवा मुली जास्त करुन ११ ते १४ वयापर्यंत पहिल्यांगा पॉर्न पाहतात. अशावेळी जर पालकांना याबाबत माहिती मिळाली तर पॅरेंट्स लगेच मुलांवर रागावतात आणि चिडतात देखील. अशी परिस्थिती खूप शांतपणे हाताळणे गरजेची असते.



प्रेमाने आणि शांतपणे समजवा

जर तुमचं मुलं देखील पॉर्न पाहाताना पकडलं गेलं असेल तर अजिबातच घाबरू नका. आपल्या मुलाला अतिशय प्रेमाने आणि शांतपणे हँडल करा. खऱ्या आणि खोट्या जगातील फरक त्याला समजावून सांगा. त्यांना हे समजावून सांगा की, ते जे बघत आहेत ते एक आभासी आणि खोटं जग आहे. जर मुलाला सेक्सबद्दल माहिती हवीच असेल तर ती त्याने योग्य पद्धतीने घेणे गरजेचे आहे. पॉर्न व्हिडीओ हा त्यासाठी योग्य मार्ग नाही.

मुलासाठी कायम राहा उपलब्ध

हल्ली सिंगल चाईल्डच सगळ्या घरात पाहायला मिळतात. त्यामध्ये पण दोन्ही पालक कामाला जातात. अशावेळी पालक म्हणून तुम्ही मुलांसाठी उपलब्ध असणे अत्यंत गरजेचे आहे. एकटी असलेली मुलं मोबाईलवर अधिक वेळ घालवतात. अशावेळी पालकांनी मुलांना अधिक वेळ देणे. त्यांचा दिनक्रम जाणून गेणे गरजेचे आहे. कारण मुलं एकटी असली की, नेट सर्फिंग करत राहतात. अशावेळी पालकांनी मुलांना पडणाऱ्या प्रश्नांना तुम्ही उत्तर देण्यासाठी उपलब्ध असाल.

मुलांना मोकळं होऊ द्या

पालकांनी मुलांशी संवाद साधायला हवा. हा संवाद उपदेशाचा किंवा चौकशीचा होणार नाही याची विशेष काळजी घ्या. या वयात मुलांना अनेक प्रश्न पडत असतात. मग ते आपल्या शरीराबद्दल असोत किंवा वैचारिक असोत. पण तेव्हा तुम्ही ते शांतपणे सोडवा. कारण मुलं जितकी मोकळी तुमच्याशी या वयात होतील तेवढी चांगली. कारण या वयात मुलं अनेकदा पालकांशी या विषयांवर बोलायला घाबरतात.

चुकूनही रागवू नका

एक्सपर्टच्या म्हणण्यानुसार, जर तुमचं मुलं पॉर्न पाहताना तुम्ही पाहिलं तर चुकूनही रागवू नका. कारण रागवल्यामुळे परिस्थिती बिघडते. अशावेळी अनेक पालक इंटरनेट ब्लॉक करणे गॅजेट्स काढून घेणे यासारख्या चुका करतात. यामुळे मुलं अधिक चुकीचं वागू लागतं. शिस्तीने न वागता पालकांनी मुलांशी शांतपणे संवाद साधावा.

## प्रभासच्या या ३ मोठ्या चित्रपटांवर आल्या या ३ रोमांचक बातम्या, चाहत्यांची मने होतील आनंदाने प्रफुल्लित

**मुंबई/प्रतिनिधी :** प्रभास सध्या यशाच्या सिंहासनावर स्वार आहे. त्याचे मागील दोन्ही चित्रपट 'सालार' आणि 'कल्की' यांनी बॉक्स ऑफिसवर चांगली कामगिरी केली आहे. 'सालार'ने जवळपास ६१७ कोटींची कमाई केली, तर 'कल्की'ने जवळपास १०४२ कोटी रुपये कमावले. या दोन्ही चित्रपटांच्या कमाईनंतर त्याच्या आगामी चित्रपटांची उत्सुकता वाढली आहे. त्याच्याकडे सध्या तीन चित्रपट आहेत. या महिन्यात तिन्ही चित्रपटांचे काही मोठे अपडेट्स समोर आले आहेत. चला सांगतो.

ऑक्टोबर महिना प्रभाससाठी खास महिना असरणा आहे. या महिन्याच्या २३ तारखेला त्याचा वाढदिवस आहे. प्रभास आणि त्याच्या चित्रपटांच्या निर्मात्यांना या दिवसाचा फायदा घ्यायचा आहे. २३ ऑक्टोबर हा दिवस 'स्पिरिट', 'फौजी' आणि 'द राजासाब'साठी मोठा दिवस असणार आहे.

१. स्पिरिट

प्रत्येकजण प्रभासच्या 'स्पिरिट' या चित्रपटाची आतुरतेने वाट पाहत आहे. २०२५ च्या अखेरीस तो रिलीज होण्याची शक्यता आहे. 'निमल'चे संदीप रेड्डी वंगा बनवत असल्याने या चित्रपटाकडून अपेक्षा वाढल्या आहेत. यामध्ये प्रभास पोलिसाच्या भूमिकेत दिसणार आहे. त्याची ऑडिओ झलक २३ ऑक्टोबरला येऊ शकते. त्यात काही संगीत असू शकते आणि रिलीजची तारीख जाहीर होऊ शकते किंवा प्रभासच्या आवाजात काहीतरी असू शकते.

२. फौजी

प्रभासचा पुढचा मोठा चित्रपट 'फौजी' आहे. या चित्रपटाचे बजेट जवळपास ५०० कोटी रुपये असल्याचे सांगण्यात येत आहे. हा २०२५ मध्ये देखील रिलीज होऊ शकतो. हनु राघवपुडी या चित्रपटाचे दिग्दर्शन करत आहेत. सिनेजोशच्या रिपोर्टनुसार, 'फौजी'चा फर्स्ट लूक २३ ऑक्टोबरला येऊ शकतो.

३. राजासाब

'द राजासाब' ची रिलीज डेट १० एप्रिल २०२५ आहे. प्रभासच्या आगामी चित्रपटांपैकी हा एकमेव चित्रपट आहे, ज्याची रिलीज डेट निश्र्चित झाली आहे. या चित्रपटाचे बजेट जवळपास ४०० कोटी आहे. याचा टीझर प्रभासच्या वाढदिवसाला म्हणजेच २३ ऑक्टोबरला येऊ शकतो, असे बोलले जात आहे.

म्हणजेच प्रभासच्या चाहत्यांना त्याच्या वाढदिवशी ३ मोठी भेटवस्तू मिळणार आहेत. जरी हा फक्त अंदाज आहे. खरे प्रकरण २३ ऑक्टोबरलाच कळेल. तुम्ही थांबा आणि आम्हीही थांबतो.

# प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेच्या माध्यमातून जलसंधारण!

राज्यामध्ये पडीक जमिनीची व्याप्ती मोठ्या प्रमाणात आहे. या पडीक जमिनीचा विकास करून ग्रामीण जनतेला रोजगार, उपजीविका, आर्थिक स्तर उंचावणे व त्यांच्या उत्पन्नात वाढ करणे यावर भर देण्यात येत आहे. या प्रकल्पामध्ये योग्य प्रकारे मृद संधारणाची कामे करून जमिनीची उत्पादकता वाढविणे या उद्देशाने केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना –पाणलोट विकास घटक २.० हा प्रकल्प राज्य शासनाच्या मृद व जलसंधारण विभागामार्फत राबविण्यात येत आहे.

विविध क्षेत्राच्या विकासाबरोबरच पडिक जमिनींचा विकास करुन त्या सिंचनाखाली आणणे आवश्यक आहे. यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढून देशाच्या आर्थिक विकासात भर पडणार आहे. यासाठी प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना : पाणलोट विकास घटक २.० अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. राज्यात या योजनांची अंमलबजावणी सन २०२५–२६ पर्यत प्रभावीपणे



करण्याचे नियोजन करण्यात आले असून सद्य:स्थितीत २२ हजार ७३३ लक्ष रुपये किमतीची ९७९५ कामे सुरु झाली आहेत. यासाठी १७ हजार १६२ लाख रुपये खर्चून ७,९०२ कामे पूर्ण झाली आहेत.

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना– पाणलोट विकास घटक २.० ही योजना राज्यात राबविण्यासाठी केंद्र शासनाकडून मार्गदर्शक सूचना प्राप्त झाल्या आहेत. या योजनेकरिता केंद्र व राज्य शासनाच्या निधीचे प्रमाण ६०:४० टक्के आहे. या योजनेची राज्यात सन २०२१–२२ पासून अंमलबजावणी सुरू झाली आहे. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना–पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत एकूण १४० प्रकल्प कार्यान्वित आहेत.

योजनेची संक्षिप्त माहिती :– सन २०२१–२०२२ पासून कार्यक्रम अंमलबजावणी सुरू झाली आहे.राज्याकरिता मंजूर प्रकल्पामधून ५ लाख ६५ हजार १८६ हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे. सध्याची प्रकल्प संख्या १४० आहे. यामध्ये एकूण ३० जिल्ह्यातील १०२ तालुके, १०३० ग्रामपंचायती, १६०३ गावे समाविष्ट आहेत. या प्रकल्पाचे एकूण प्रकल्पमूल्य – रु. १३३५.५६ कोटी आहे. योजनेचे निधी प्रमाण केंद्र: राज्य ६०:४० आहे.

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना – पाणलोट विकास घटक २.० च्या अंमलबजावणीकरिता केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना २०२१ नुसार राज्यस्तरीय मान्यता समिती (डब्डउ), राज्यस्तरीय नोडल यंत्रणा (डब्छअ), राज्यस्तरीय तांत्रिक समिती (डब्ढउ) व जिल्हा पाणलोट कक्ष व माहिती केंद्र (थउऊ) गठित करण्यात आलेली आहे. तसेच पाणलोट समिती (ॅण) गठित करण्यात आलेली आहे.

प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा :– राज्यातील एकूण १४० प्रकल्पांसाठी प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून पुढील प्रमाणे जिल्हा पाणलोट कक्ष तथा माहिती केंद्र (ॅण) यांचे मार्फत कृषी विभाग ८६, मृद व जलसंधारण विभाग ४५, वन विभाग २, जिल्हा परिषद ०४, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा २ व इतर १ अशा प्रकारे एकूण १४० प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा निश्चित करण्यात आलेल्या आहेत.

नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन :– या योजनेअंतर्गत नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन अंतर्गत नैसर्गिक संसाधनाशी संबंधित मालमत्ता निर्मिती, मालमत्तेची देखभाल, भौतिक कामांची देखभाल वृक्षारोपणासारख्या जैव कामांसाठी मजबूत संरक्षण उपाय, ही कामे केली जातात, याकरिता योजनेच्या प्रकल्प मूल्याच्या ४७ टक्के निधीची तरतूद आहे.

सद्य:स्थितीत नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन अंतर्गत रक्कम ४९५४३ लाख रुपयांच्या २२६७१ कामांना तांत्रिक मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच ४९२६१ लाख रुपयांच्या २२१७७ कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. यापैकी २२७३३ लाख रुपयांची ९७९५ कामे सुरु झालेली असून, १७१६२ लाख रुपये रक्कमेची ७९०२ कामे पूर्ण झालेली आहेत.

नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन अंतर्गत आतापर्यत १५६४८ लाख रुपये खर्च झालेला आहे. प्रकल्पाचा कालावधी २०२१–२२ ते २०२५–२०२६ असा असून मार्च, २०२६ मध्ये या प्रकल्पाचे काम पूर्ण होणे आपेक्षित आहे. त्यानुसार केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनूसार टप्याटप्याने खर्च करणेबाबतची कार्यवाही सुरु आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# स्वछतेमुळे शहराच्या सौंदर्यात भर

## स्वच्छतेसाठी सर्वांनी प्रयत्न करण्याचे केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ






**मेहकर / प्रतिनिधी** : शहराची स्वच्छता राखणे हे केवळ एकट्या नगरपालिकेचेच काम नसून त्यासाठी नागरिकांनी उस्फुर्त सहभाग नोंदवणे महत्त्वाचे आहे. स्वच्छतेमुळे शहराच्या सौंदर्यात भर पडते.त्यामुळे सर्वांनी स्वच्छतेसाठी पुढाकार घ्यावा, शहर स्वच्छ ठेवावे, असे आवाहन केंद्रीय आयुष, आरोग्य,कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले. सदर अभियानाचा समारोप आणि उत्कृष्ट कार्य केलेल्या सफाई कर्मचाऱ्यांना बक्षीस वितरण समारंभ आज नगरपालिकेत आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी नामदार प्रतापराव जाधव बोलत होते.


ते स्वच्छता अभियान २.० अंतर्गत मेहकर शहरामध्ये स्वभाव स्वच्छता - संस्कार स्वच्छता अभियानानिमित्त नगर पालिका येथे आयोजित स्वच्छता अभियान कार्यक्रमाच्या समारोप व बक्षीस वितरण कार्यक्रमाप्रसंगी बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आ. संजय रायमुलकर होते.तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव हे होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित प्रमुख पाहुण्यांचा मुख्याधिकारी रामराजे कापरे यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला. तसेच त्यांनी प्रास्ताविक भाषणातून नगरपालिकेने राबविलेल्या स्वच्छता अभियानाची माहिती दिली.

यावेळी मार्गदर्शन करताना केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव पुढे म्हणाले की, केवळ नगरपालिकेनेच स्वच्छता करावी अशी धारणा नागरिकांनी ठेवू नये, प्रत्येकाने या कामात योगदान द्यावे,शहरातील अतिक्रमणे व अस्वच्छता ही शहराच्या सौंदर्यात बाधा आणतात. त्यामुळे अधिकाऱ्यांनी त्याकडेही लक्ष द्यावे, असा सूचक इशारा त्यांनी दिला. तर सफाई कर्मचाऱ्यांनी शहरात राबविलेल्या स्वच्छता अभियानाचे आ. संजय रायमुलकर यांनी आपल्या भाषणातून कौतुक केले. हे माझे शहर आहे ,अशी भूमिका ठेवून सर्वांनी स्वच्छतेच्या कामात सहकार्य करण्याचे आवाहनही त्यांनी केले. स्वच्छता मोहिमेत उत्कृष्ट काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना यावेळी केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव व आ.संजय रामुलकर यांच्याहस्ते बक्षिसांचे वितरण करण्यात आले. एक झाड आईसाठी या अभियाना अंतर्गत प्रतापराव जाधव, संजय रायमुलकर यांच्याहस्ते वृक्षारोपण करण्यात आले. सर्वांनी यावेळी स्वच्छता राखण्याची शपथ घेतली.

कार्यक्रमाला अधिकारी व पदाधिकार्यांची उपस्थिती या कार्यक्रमाला उपविभागीय अधिकारी रवींद्र जोगी, तहसीलदार निलेश मडके,अजय पिंपरकर, सहाय्यक गटविकास अधिकारी संदीप मेटांगळे, ठाणेदार शिंगटे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती माधवराव जाधव, शिवसेनेचे तालुका प्रमुख सुरेश वाळूकर, जिल्हा उपप्रमुख राजेंद्र गाडेकर, शहर प्रमुख जयचंद भाटिया, महिला आघाडीच्या माया मस्के, वैशाली सावजी, कविता दांदडे, रविराज रहाटे, नीरज रायमुलकर, युवा सनेचे भूषण घोडे, अख्तर चुडीवाले ,तौफिक कुरेशी, हनीफ गवळी ,मनोज जाधव ,समाधान सास्ते, अक्काताई गायकवाड त्याचप्रमाणे नगरपालिकेचे अजय चैताणे, सुधीर सारोळकर, अभियंता अजय मापारी, संजय गिरी, श्रीकृष्ण जयवाळ, गणेश डोंगरे, संतोष राणे, अनिल मुळे, विशाल शिरपूरकर, शेख जफर, बंडू जवंजाळ आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

## संक्षिप्त...

### साताऱ्यात गॅस सिलेंडरच्या स्फोटात एकजण ठार तर दोघे जखमी






दैनिक आपला विदर्भ

**सातारा / प्रतिनिधी** : साताऱ्यातील माची पेठ परिसरात अचानक गॅस सदृश्य वस्तूचा स्फोट झाल्याने मोठी दुर्घटना घडली असून या दुर्घटनेत एकाचा जागेस मृत्यू झाला आहे तर दोन जण जखमी झाले आहेत. या घटनेमुळे सातारा शहरात मोठी खळबळ उडाली असून सातारा शाहूपुरी पोलीस या घटनेचा शोध घेण्यासाठी घटनास्थळी दाखल झाले आहे. तर स्पोर्ट झालेल्या च्या आवाजामुळे परिसरात एकच हलकल्लोळ माजला होता तर नागरिकांमध्ये या स्फोटाची मोठी भीती देखील बसली होती सध्या सातारा पोलीस हा स्फोट कशामुळे झाला याचा शोध घेत असून अद्याप हा स्पोर्ट कशामुळे झाला आहे याची माहिती मात्र पोलिसांकडून अधिकृतरित्या देण्यात आलेली नाही मात्र या सदृश्य कोणत्यातरी वस्तूचा स्फोट झालेलेच प्राथमिक अंदाज घटना सरळ वरून मिळालेल्या माहितीने समोर येत आहे.

### रोहे येथील कुंडलिका नदीवरील शिवसृष्टी परीसरातील छ. शिवाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे उद्या लोकार्पण



दैनिक आपला विदर्भ

**रायगड / प्रतिनिधी** : रायगडच्या रोहा येथील कुंडलिका नदीवरील शिवसृष्टी परीसरात छ. शिवाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे लोकार्पण सोहळा पार पडणार आहे. छ. शिवाजी महाराजांचा महाराष्ट्रातील सर्वात उंच असा २५ फुटी पुतळा अतिशय रेखीव असून पुण्यातील कला संस्कार स्टुडिओचे ख्यातनाम शिल्पकार महेंद्र थोपटे व त्यांच्या सहकाऱ्यांनी हा भव्य पुतळा साकारला आहे. पुतळ्याची उंची २५ फूट आहे, तर चबूतऱ्यासह पुतळ्याची एकूण उंची ५० फूट आहे. ब्राँझ या धातूपासून घडविलेला हा पुतळा ८. ५ टन इतका वजनाचा आहे. खासदार सुनिल तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणाऱ्या या लोकार्पण सोहळ्यास छत्रपती घराण्यातील खासदार उदयनराजे भोसले आणि युवराज संभाजी राजेंची उपस्थिती राहणार आहे. या कार्यक्रमास हजारो शिवप्रेमींची उपस्थिती लाभणार आहे.

### भीषण अपघात! पुण्यात हेलिकॉप्टर कोसळले; तिघांचा मृत्यू

**पुणे / प्रतिनिधी** : पुणे शहरातून भीषण अपघात घडल्याची बातमी समोर आली आहे. पुण्यातील बावधान परिसरात खासगी हेलिकॉप्टर कोसळून ३ जणांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, आज सकाळी पुणे जिल्ह्यातील बावधन परिसरात ही घटना घडली. पुण्यातील ऑक्सफर्ड काऊंटी रिसॉर्टच्या हेलिपॅडवरुन या हेलिकॉप्टरने सकाळी साडेसात वाजेच्या सुमारास उड्डाण घेतलं होतं. हे उड्डाण घेतल्यानंतर अवघ्या तीन मिनिटांत या हेलिकॉप्टरचा अपघात झाला. ऑक्सफर्ड काऊंटी रिसॉर्ट आणि एचईएमआरएल ही या केंद्र सरकारच्या संस्थेदरम्यान असलेल्या डोंगराळ भागात हेलिकॉप्टरला अपघात झाला. दुर्घटनेनंतर हेलिकॉप्टरला भीषण आग लागली असून परिसरातून धुराचे लोट पसरले होते.दरम्यान, दाट धुक्यामुळे ही घटना घडल्याचा अंदाज असून या अपघातात दोन पायलट आणि एका इंजिनिअरचा मृत्यू झाला.

## बस स्थानकातील मुत्रीघर व शौचालयाचे नव्याने बांधकाम करण्याची मागणी

दैनिक आपला विदर्भ

**यवतमाळ / प्रतिनिधी** : शहरातील बस स्थानकातील जीर्ण झालेल्या मुत्रीघर व शौचालयाचे नव्याने बांधकाम करण्या बाबत बहुजन मुक्ती पार्टीच्या वतीने आगार व्यस्थापक बस स्थानक दारव्हा यांना निवेदन देण्यात आले.

सविस्तर वृत्त असे की,दारव्हा बस स्थानकातील जीर्ण झालेल्या महिला व पुरुषांकरिता असलेल्या मुत्रीघर व शौचालयाचे नव्याने बांधकाम करणे अत्यंत आवश्यक असून ते कधीही प्रवाशी नागरिकांच्या अंगावर शौचालय कोसळून त्या ठिकाणी अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही कारण मुत्रीघर व शौचालयाच्या भिंतीला अनेक ठिकाणी भेगा /तडे गेले असून वरील छताचे सिमेंटचे थर खाली पडत असल्यामुळे प्रवाशी नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून त्वरित मुत्रीघर व शौचालयाचे नव्याने बांधकाम करण्यात यावे.अशा आशयाचे निवेदन बिमोद विठ्ठलराव मुधाने बहुजन मुक्ती पार्टी जिल्हा अध्यक्ष पुसद विभाग नेतृत्वात आगार व्यवस्थापक बस स्थानक दारव्हा यांना देण्यात आले. तर यावेळी प्रांजली राठोड, प्राची राठोड,संचिता आडे,पूजा कवाने,दिव्या दावने,संध्या



अंबुरे,चतुर्थी दावणे,रेश्मा अंबुरे, सुवर्णा शिंगाडे प्रणाली आडे, छकुली आडे,किशोर मोहाडे, रोहन सावळे,गौरव चौधरी, विजय सोनोने, आदित्य उघडे, सुजल उघडे, अंजली मोहाडे,चैताली कांबळे, मोहिनी कांबळे, प्राप्ती इंगळे, नीलिमा यादव,अक्षरा वानखडे,आयशा देशमुख, प्रांजली दायदार,साक्षी खंडारे, अंकिता गावंडे, आदिती गावंडे, अर्चना मुधाने,लक्ष्मी कदम,ऋतिका जाधव असे अनेक जणांच्या सह्या निशी निवेदन देण्यात आले.

## पंतप्रधानांकडून महात्मा गांधी व शास्त्रींना अभिवादन

नवी दिल्ली : महात्मा गांधी आणि देशाचे माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आदरांजली अर्पण केलीय. यासंदर्भात त्यांनी सोशल मीडियावर फोटोसह श्रद्धांजली संदेश जारी केला आहे.

गांधींच्या १५५ व्या जयंतीनिमित्त पंतप्रधानांनी राजघाट येथे जाऊन त्यांच्या समाधीस्थळी अभिवादन केले. यासंदर्भातील संदेशात पंतप्रधान म्हणाले की, सर्व देशवासियांच्या वतीने आम्ही आदरणीय बापूंना त्यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करतो. सत्य, समरसता आणि समतेवर आधारित त्यांचे जीवन आणि आदर्श देशवासीयांसाठी नेहमीच प्रेरणादायी राहतील असे त्यांनी आपल्या संदेशात नमूद केले आहे. यासोबतच मोदींनी माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांनाही श्रद्धांजली वाहिली.

विजय घाट या शास्त्रींच्या समाधीस्थळी पुष्पांजली अर्पण करून शास्त्रींना अभिवादन केल्यानंतर पंतप्रधान म्हणाले की, 'माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन. त्यांनी देशाचे सैनिक, शेतकरी आणि स्वाभिमानासाठी आपले जीवन समर्पित केल्याचे पंतप्रधानांनी म्हंटले आहे. यासोबतच विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी देखील महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांच्या समाधीस्थळी जाऊन अभिवादन केले.

## नवरात्रोत्सवात अमरावतीमध्ये 'या' मार्गावर जड वाहनांना बंदी!

दैनिक आपला विदर्भ

**अमरावती / प्रतिनिधी** : नवरात्रोत्सव दरम्यान अम रावतीमध्ये अपघात होऊ नये किंवा कायदा व सुव्यथेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी एक अधिसुचना जारी केली आहे. यामध्ये शहरातील १० म र्गावर नवरात्रोत्सव काळात जड वाहनांना बंदी करण्यात आली असून अंबादेवी, एकविरा देवीसह मोठया मंडळांजवळ पार्किंगचे स्थान निश्चित केले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नवरात्री दरम्यान एकविरा देवी, अंबादेवी मंदिर, राजकमल चौक, गांधी चौक,चुनाभट्टी रोड, अंबागेट म र्गाव्रील यात्रेत होणारी भाविकांची गर्दी पाहता सुरक्षिततेच्या खबरदारीने उपाययोजना म्हणून ३ ऑक्टोंबरच्या मध्यरात्रीपासून १२ ऑक्टोंबरच्या मध्यरात्री १२ वाजेपर्यत मंदिर परिसर, यात्रा मार्ग आणि मुख्य रस्त्यावर वाहतूक नियंत्रणा करिता सुचना दिल्या आहेत. या कालावधीत अनेक मार्ग बंद करण्यात आले असून पर्यायी मार्ग उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

कोणते मार्ग वाहतुकीसाठी बंद?

राजकमल चौक ते अंबागेट, साबनपुरा ते गांधी चौक, ओसवाल भवन ते गांधी चौक, डॉ. धवड यांच्या दवाखाना ते गांधी चौक, मुख्य पोस्ट ऑफीस रोड ते पंचशिल लॉन्ड्री ते गांधी चौक पर्यत, भुतेश्वर चौक ते गांधी चौक पर्यत, नमुनाकडून अंबादेवी देवस्थानकडे जाणारे सर्व लहान रस्ते बंद राहतील.

सक्कारसाथ ते भाजीबाजार जैन मंदिरापर्यत, अंबागेट ते औरंगपुरा मार्ग, अंबादेवी मंदिराकडे जाणारा मार्ग, टांगापडाव ते साबपुरा पोलिस चौकी ते प्रभात चौक या मार्गावर जड वाहनांना प्रवेशबंदी करण्यात आली आहे.

काय आहेत पर्यायी मार्ग?

मालवाहु, जड व हलकी, गिट्टी बोल्डर वाहने जुनी वस्ती बडनेरा टी-पाईन्ट येथून जुना बायपास मार्गे एमआयडीसी, दस्तुर नगर चौक, चपराशीपुरा चौक, बियाणी चौक येथून डावे वळण घेऊन गर्ल्स हायस्कुलचौक, इर्विनचौक, मालवियचौक, दिपक चौक मार्गाचा अवलंब करता येईल.

एसटी बसेस बसस्थानक, राजकमल, गद्रे चौक मार्ग बडनेरा जात व येतात त्या बसेस वाहनांसाठी राजापेठ-इर्विन चौक या उड्डाणपुलावरून गर्ल्स हायस्कुल चौक, पोलिस पेट्रोल पंप, बस स्थानक किंवा जुनी वस्ती बडनेरा येथून उजवे वळण घेऊन जुना बायपास मार्गाने दस्तुनगर, चपराशीपुरा चौक, बसस्थानक या पर्यायी मार्गाचा अवलंब करितील.

बसस्थानकातून नागपुरीगेट मार्ग बाहेरगावी जाणाऱ्या बस रेल्वे स्टेशन चौक, इर्विन चौक, चित्रा चौक मार्ग जातील व याच मार्गाने शहरात येऊन गर्ल्स हायस्कुल चौक मार्गे बसस्थानकात जातील. राजापेठ चौकाकडून शहरात येणाऱ्या हलके चारचाकी वाहन यांना राजकमल चौकात प्रवेशबंदी असल्याने वाहनधारकांनी राजापेठ उड्डाणपुलाचा वापर करावा.

**अशी आहे वाहनांसाठी पार्किंग व्यवस्था**

नवरात्री काळात भाविकांच्या वाहनांसाठी नेहरू मैदान, ओसवाल भवन मैदान, म ुधोळकरपेठ मैदान, ओसवाल भवन ते गद्रे चौका कडील रस्त्याचे एका बाजुस, हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे वळणापासून ते साईनगर कडे जाणाऱ्या रस्त्याचे एकाबाजुस, साबनपुरा चौक ते जवाहर गेट कडी रस्त्याचे एका बाजुस पार्कीगची व्यवस्था करण्यात आली आहे.

### ऑफिस बॉयनेच दिली सिमेंटमालकाला लुटण्याची सुपारी

**नाशिक / प्रतिनिधी** : नाशिकमध्ये एका सिमेंट व्यापाऱ्यावर अज्ञातांनी केलेल्या हल्ल्याने खळबळ उडाली आहे. हल्लेखोरांनी व्यापाऱ्यावर चाकूने हल्ला करत दांड्याने डोक्यात जोरदार वार केला. धक्कादायक बाब म्हणजे, या हल्ल्यामागे स्वत: पीडित व्यापाऱ्याच्या ऑफिस बॉयनेच त्याला लुटण्याची सुपारी दिल्याचं समोर आलं आहे. ऑफिस बॉयनंच सिमेंटमालकाला सुपारी दिल्याची घटना उघडकीस आली असून व्यापाऱ्याला गंभीर जखम झाल्याचं सांगितलं जातं आहे.


# रोहिणीताई खडसे यांच्या हस्ते होणार भव्य बचतगट प्रदर्शनीचे उद्घाटन

## सुषमाताई अंधारे करणार प्रमुख मार्गदर्शन ; हेमलताताई भूषविणार अध्यक्षस्थान

दैनिक आपला विदर्भ


**बुलडाणा / प्रतिनिधी** : दिशा बुलढाणा जिल्हा महिला बचतगट फेडरेशनच्यावतीने ४,५ व ६ ऑक्टोंबर रोजी महिला उद्योजक तथा बचतगट प्रदर्शनी आयोजित करण्यात आली आहे.येथील मलकापूर रोडवरील एआरडी सिटी मॉलच्या मागे,बुलडाणा रेसिडेन्सीसमोरीलमैदानात सकाळी ११ वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत या बचतगट प्रदर्शनीचा उद्घाटन समारंभ होणार आहे.यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन संस्थापक अध्यक्ष जयश्रीताई शेळके यांनी केले आहे.

या प्रदर्शनीचे उद्घाटनराष्ट्रवादी महिल काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्ष ड.रोहिणीताई खडसेयांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमालाशिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमाताई अंधारेप्रमुख मार्गदर्शक म्हणून लाभणार आहेत. तसेचमहाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्याराज्य प्रवक्ता तथा सरचिटणीसमा. हेमलताताई पाटीलकार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान भूषविणार आहेत. त्याचबरोबर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या जिल्हाध्यक्ष रेखाताई खेडेकर, बुलडाणा अर्बनचॅरिटेबल ट्रस्टच्या अध्यक्ष कोमलताई झंवर, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या सचिव मा.स्वातीताई वाकेकर, मा.मिनलताई आंबेकर, महिला उद्योजिका सीताबाई मोहिते यांची कार्यक्रमाला विशेष उपस्थिती राहणार आहे. त्याचबरोबर जिल्हाभरातून हजारोच्या संख्येने महिला उपस्थितीत राहणार आहेत.










### २५० स्टॉल असणार उपलब्ध

बुलढाणा येथे आयोजित दोन दिवसीय बचतगट प्रदर्शनीत जवळपास २५० स्टॉल लावण्यात येणार आहेत.खाद्यजत्रा,हस्तकला वस्तू हस्तशिल्प,घरगुती पदार्थ व मसाले,महिला गृहउद्योग उत्पादित वस्तू,महिलांचा स्नेहमिलन सोहळा,महिलांचा आनंदोत्सव,महिला उद्योजकांचा गौरव समारंभ असे या प्रदर्शनीचे वैशिष्ट्ये आहेत.महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्यादृष्टीने ही बचटगट प्रदर्शनी महत्वाचे पाऊल ठरणार आहे.

### समाजप्रबोधनकार प्रविणजी दवंडे यांचे किर्तन ठरणार आकर्षण

बचतगट प्रदर्शनीत दोन दिवस विविध कार्यक्रमांची रेलचेल राहणार आहे.प्रसिद्ध समाजप्रबोधनकार पवनजी दवंडे यांचा प्रबोधनात्मक किर्तनाचा कार्यक्रम विशेष आकर्षण ठरणार आहे.शिव,फुले,शाहू,आंबेडकर यांच्या विचारांची पेरणी ते आपल्या वाणीतून करणार आहेत.कौटुंबिक जीवनातील विविध प्रसंग,देश-समाजातील इतर समस्या,अधूनमधून विनोदाची पेरणी करत कीर्तनात सादर करत असतात.त्यांच्या कीर्तनाला महिला आणि तरुणाईचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत असतो. सामाजिक जनजागृतीसाठी हा लोकोपयोगी व प्रबोधनात्मक उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. यासोबतच इतरही कार्यक्रम यादरम्यान आयोजित करण्यात आले आहेत.

# ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदेंची शिकवण राहुल गांधींनी घ्यावी

## चंद्रशेखर बावनकुळे यांचा राहुल गांधींना सल्ला

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** केंद्रीय गृहमंत्री अमित शाह नुकतेच महाराष्ट्राचा दौरा करून गेले आहेत. त्यांनी मुंबई येथे पक्ष पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद साधला. मात्र निवडणुकीच्या उमेदवाराशी या बैठकीचा काहीही संबंध नाही,अमित शाह यांनी बूथस्तरीय कार्य योजना दिली आहे. लोकसभेत ज्या ठिकाणी आम्ही मागे राहिलो, त्या ठिकाणी पुढे जाण्यासाठी ही योजना आहे. त्या अनुषंगाने ही बैठक घेण्यात आली होती.अशी माहिती भाजपचे



प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली तर सुशील कुमार शिंदे यांनी वीर सावरकर यांच्या बद्दल केलेल्या स्तुती हे योग्य असून सुशील कुमार शिंदे ची शिकवण राहुल गांधींन घ्यावी, असा सल्ला भाजपचे प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी दिला. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना प्रसार माध्यमाने प्रश्न विचारून बोलते केले असता चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की नारायण राणे यांनी मुख्यमंत्री शिंदे यांची घेतलेली भेट आहे. तर निलेश राणे शिवसेनेत प्रवेश करणार अशी चर्चा आहे. या संदर्भात प्रश्न केला असता चर्चा असतात, चर्चेला विराम नसतो या भेटीचा तसा अर्थ घेऊ नये, असे ते म्हणाले. तसेच सुशील कुमार शिंदे यांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांबद्दल पहिल्यांदाच काँग्रेस पार्टीतून स्तूतीसुमनं उधळली. याबाबत प्रश्न केला असता राहुल गांधी यांनी यातून शिकवण घेतली पाहिजे, सुशील कुमार शिंदे यांनी केलेला अभ्यास राहुल गांधींना सांगितला पाहिजे, शिंदे यांनी राहुल गांधींना सल्ला दिला पाहिजे, राहुल गांधी जेव्हा जेव्हा महाराष्ट्रात आले तेव्हा तेव्हा स्वातंत्र्यवीर सावरकरांचा अपमान केला आहे. आता काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुशील कुमार शिंदेची शिकवण राहुल गांधींनी घ्यावी असा सल्ला त्यांनी राहुल गांधी यांना दिला. तर हेलिकॉप्टर अपघाताबाबत दुःख व्यक्त करून धुक्यामध्ये अशी रिक्स घेणे सर्वांनी टाळावे यातून बोध घ्यावा, महाराष्ट्राच्या निवडणुकीचा आतापर्यंतचा विचार केला तर आचार संहिता जाहीर झाल्यानंतर प्रत्येक पक्ष हा आपल्या उमेदवार याद्या जाहीर करतात, त्याची वाट बघू, अंबानीं ठाकरे यांचे पारिवारीक संबंध आहेत,त्याचा अर्थ काही जोडू नये, तर जरांगे असो की लक्ष्मण हाके असो पाडापाडीची भाषा करू नये, कोणाला जिंकून द्यायचं आणि पाडायचा याचा जनता निर्णय करते, तसं कोणीही बोलू नये जनतेसाठी जातीपाती जाऊन बाहेर काम करतो, त्यामुळे जात-पाथ धर्म पंत आणून निवडणुका लढणे हे महाराष्ट्राला मान्य नाही. समाजाचे एकही घर नसताना अनेकदा निवडून आल्याचे अनेक नागपूरात नेते आहे. त्यामुळे जातीपातीला राजकारणात थारा नाही व्यक्ती व त्याच्या कर्तुत्वावर राजकारण केल्या जाते असे भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

## भावाचा बहिणीच्या गावात हृदयविकाराने मृत्यू

### बहिणीचा एकच आक्रोश : डोणगाव परिसरात हळहळ

दैनिक आपला विदर्भ

■ गजानन जाधव

**बेलगाव :** सोयाबीन सोगणीचा हंगाम असल्याने हातचे काम सोडून बहिणीच्या गावी सोयाबीन सोगण्यासाठी गेलेल्या भावाचा हृदयविकाराने मृत्यू झाला.ही हृद्दयदायक घटना २ ऑक्टोबर रोजी बेलगाव शेत शिवारात घडली. फिरोज खान डोणगाव असे मृतक भावाचे नाव आहे.

घटनेबाबत प्राप्त माहितीनुसार डोणगाव येथील फिरोज खान अमानुल्ला खान वय ३२ वर्ष गवंडी काम करायचा. परंतु सध्या सोयाबीन सोनवणीचा हंगाम असल्याने व मजूर मिळत नसल्याने तो सोयाबीन सोगणीसाठी बहिणीच्या घरी ग्राम बेलगाव येथे गेला होता. मागील एक दोन दिवसापासून त्याची तब्येत खराब होती.मात्र तो त्याला न जुमानता काम करीत होता. अश्यातच दि.२ अक्टोबरच्या सकाळी ७ वाजताच्या सुमारास राजेश भाऊराव वानखेडे यांच्या शेतात सोयाबीन सोंगत असतांना फिरोज खान याच्या छातीत कळा निघायला सुरवात झाली आणि त्याने हा त्रास भाऊजी व बहीण यांना सांगितला. त्यांनी बेलगाव येथे त्याच्या घरी आणले. तेथे त्याला पुन्हा चक्कर आल्याने त्याला मोटारसायकल बसवून डोणगाव दवाखान्यात आणण्यासाठी निघाले.मात्र वाटेतच त्याला मृत्यूने गाठले. त्याच्या पश्र्चात त्याला दोन लहान लहान मुली, पत्नी आई असा आप्त पारिवार आहे.फिरोज खान यांच्या मृत्युंची बातमी कळताच डोणगाव परिसरात शोककळा पसरली फिरोज खान हा कामाशी काम करणारा गरीब होतकरू होता अश्यातच त्याला मृत्यूने कवटाळल्याने डोणगाव परिसरात हळहळ व्यक्त होतं आहे. तर बहिणीने मात्र एकच आक्रोश करत आपल्या अश्रूंना वाट मोकळी करून दिली. बहिणींच्या या आक्रोशाने मात्र उपस्थितांचेही डोळे पाणावले.

## स्व.पुष्पादेवी पाटील महाविद्यालयात महात्मा गांधी, लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी




दैनिक आपला विदर्भ

■ प्रभाकर पाटील

**रिसोड :** येथील स्व.पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालयात सांस्कृतिक विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम.एन.गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ.एम.एन. गायकवाड यांनी, मोहनदास करमचंद गांधी हे भारताच्या स्वातंत्र्य संग्रामातील प्रमुख नेते आणि तत्त्वज्ञ होते. ते एक वकील, वसाहतविरोधी राष्ट्रवादी नेते आणि राजकीय नैतिकतावादी होते. ब्रिटिश राजवटीपासून भारताच्या स्वातंत्र्याच्या यशस्वी मोहिमेचे नेतृत्व करण्यासाठी महात्मा गांधींनी अहिंसक आंदोलनाचा वापर केला. नंतर जगभरातील अनेक नागरी हक्क आणि स्वातंत्र्य चळवळींना महात्मा गांधींकडून प्रेरणा मिळाली. महात्मा असा त्यांचा सन्माननीय उल्लेख प्रथम दक्षिण आफ्रिकेत १९१४ मध्ये केला गेला. आता हा शब्द जगभरात त्यांच्यासाठी वापरला जातो. लाल बहादूर शास्त्री हे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील स्वातंत्र्यसैनिक व भारतीय प्रजासत्ताकाचे दुसरे पंतप्रधान होते. त्यांनीहोते 'जय जवान, जय किसान' हा घोषणामंत्र दिला. देशासाठी केलेल्या महत्त्वपूर्ण कार्यासाठी त्यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्काराने गौरवण्यात आले. असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.डॉ.प्रकाश हनवते यांनी केले. आभार प्रदर्शन , राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख प्रा.डॉ. केशव कोकाटे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.डॉ.आम्रपाली भगत, प्रा. डॉ. सिद्धार्थ इंगोले यांचे सहकार्य लाभले. याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## बीबी येथे नागरिकांसाठी ईव्हीएम मशीन जनजागृती मोहीम राबविण्यात आली



दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी :** आगामी विधानसभा निवडणूकी करीता जिल्हाअधिकारी कार्यालय बुलढाणा यांच्या मार्फत संपुर्ण जिल्हयामध्ये इव्हीएम मशीन जनसामान्यांना माहीती व्हावी व आपल्या मताची जानीव व्हावी मतदान कशा प्रकारे करता येते याचे प्रात्यक्षिक राबवीत आहे आपण केलेले मतदान हे योग्य होते की नाही याचे प्रात्यक्षिक करून दाखवले अशा प्रकारे ईव्हीएम मशीन गाडी गावोगावी जात जनजागृती करत आहे आज बिबी गावात सुद्धा जनजागृती करण्यात आली यावेळी ए एस सौदर तलाठी बिबी, परमेश्र्वर शळके कॅमेरामन,भागवत गिरी पोलीस कॉन्स्टेबल ,ताराचंद भोसले कोतवाल, संतोष मुळे, कचरू राठोड, सुधाकर कापकर, सह अनेक नागरिक उपस्थित होते

## वाशिम जिल्हा ओला दुष्काळीग्रस्त घोषित करावा, संभाजी ब्रिगेडची मागणी

दैनिक आपला विदर्भ

**वाशीम/प्रतिनिधी :** यावर्षी पावसाळ्याच्या सुरुवातीपासूनच वाशीम जिल्ह्यात संततधार पाऊस सुरू असल्यामुळे सोयाबीन पिकांचे प्रकाश संश्र्लेषण व परागीकरण झाले नाही. त्याचबरोबर वेगवेगळ्या रोगांचा प्रादुर्भाव पिकांवर झाला.परिणामी उत्पादनात प्रचंड घट आली आहे. तर परतीच्या पावसाने पिकांचे प्रचंड नुकसान केले आहे.

त्यामुळे वाशीम जिल्ह्यात ओला दुष्काळ घोषीत करून शेतकर्यांना मदत करावी, अशी मागणी संभाजी ब्रिगेडच्या वतीने करण्यात आली. यावर्षी सुरवातीपासून संततधार पाऊस सुरू असल्याने सोयाबीन पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. तर लागवड खर्च वाढला असून भाव मात्र लागवडीच्या तुलनेत नसल्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसला आहे.अशा स्थितीत वाढत्या महागाईमुळे खर्च भागविणे कठीण झाले आहे. तर वाशीम जिल्ह्यात दुष्काळ घोषीत करून आर्थिक मदत करावी, अशी मागणी संभाजी ब्रिगेडच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. वाशीम जिल्हा दुष्काळग्रस्त म्हणून घोषीत न केल्यास संभाजी ब्रिगेडच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही संभाजी ब्रिगेडच्या वतीने दिला आहे.

या निवेदनावर संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष गणेश सुर्वे, जिल्हा महासचिव ईसाक शेख, जिल्हा प्रवक्ता विकास देशमुख, कार्याध्यक्ष गजानन खंदारे, कार्याध्यक्ष रमेश मुंजे, जिल्हा संघटक गजानन व्यवहारे, जिल्हा उपाध्यक्ष संतोष भिसडे, जिल्हा उपाध्यक्ष श्रीकृष्ण शिंदे, विधानसभा अध्यक्ष राधेश्यामम शिरसाट आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## नागरे महाविद्यालयाने केला स्वच्छता पंधरवड्याचा समारोप

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**सिंदखेडराजा :** स्थानिक दुसरबीड येथे दिनांक २ ऑक्टोबर महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र शासनाने २ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर हा कालावधी स्वच्छता संस्कार स्वच्छता स्वभाव या घोषवाक्याने राबविण्याचा संकल्प करून संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने व नारायणराव नागरे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या माध्यमातून हा पंधरवाडा विविध अशा कार्यक्रमाच्या माध्यमातून राबविण्यात आला. प्रामुख्याने राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी पटनाट्य प्रभात फेरी वकृत्व स्पर्धा अशा विविध कार्यक्रमातून स्वच्छतेचा संदेश खेड्यापाड्यापर्यंत पोहोचण्याचे कार्य राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांच्या माध्यमातून करण्यात आले स्वच्छतेचा समारोपीय कार्यक्रम गांधीजींच्या जयंतीच्या दिवशी दुसरबीड बाजारपेठेतील प्लास्टीक पिशव्या व कचरा २ ट्रॅक्टर जमा करण्यात आला . याप्रसंगी प्रतिष्ठित नागरिक तथा सरपंच सौ. सरस्वतीबाई मखमले व उपसरपंच अशोकराव गुंजाळ , ग्रामपंचायत अधिकारी अशोकराव बुरकुल , सरपंचपती डॉ. शरदराव मखमले ग्रामपंचायत सदस्य अबरार भाई अल्पसंख्यांक अध्यक्ष जावेद भाई कलिमभाई पठाण , विष्णू खंदारे , सतिश बिथ्रे , संजय तिपाले , संतोष झोरे , गणेश ढवळे , सुनिल देशमुख , आस्लम भाई ठेकेदार , संजय मोतेकर , खरात काका टेलर , स्पर्धापरीक्षा मार्गदर्शक महेश दराडे व इतर प्रतिष्ठित नागरिक यांच्या उपस्थितीत महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी तथा प्राचार्य डॉक्टर विजय नागरे यांच्या माध्यमातून हे विविध उपक्रम राबविण्यात आले समरूपये कार्यक्रमांमध्ये प्राचार्य डॉ विजय नागरे यांनी पंधरवड्यामध्ये घेण्यात आलेल्या कार्यक्रमांचा आढावा घेतला.




स्वच्छतेचे उत्कृष्ट कार्य करणारे स्वयंसेवकांचा सत्कार तसेच वकृत्व स्पर्धेमध्ये भाग घेतलेल्या स्वयंसेवकांचा व रांगोळीच्या माध्यमातून स्वच्छतेचा संदेश देणाऱ्या स्वयंसेविकांचा सत्कार करण्यात आल्याचे सांगितले या उपक्रमातून आरोग्याच्या दृष्टीने स्वच्छता ही किती महत्त्वाची असते स्वच्छतेमुळे रोगराई दूर होते त्यामुळे हा उपक्रम पंधरवड्यामध्येच न राबवता वर्षभर आपण ज्या ठिकाणी राहत असेल तेथे स्वच्छता ठेवणे ही आपली जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले तसेच अंतर्मन व बाह्य स्वच्छता ठेवण्याचा संकल्प करण्यात आला यावेळी महाविद्यालयातील प्रा. डॉ . दीपक देशमाने प्रा . एस .आर .वाघ प्रा . देवानंद नागरे प्रा . सत्यम श्रीवास्तव प्रा . कु .नयना गवारे प्रा . शेख युनूस प्रा . जगदीश यादव प्रा . मिलिंद गवई श्री भाऊराव पांढरे श्री अनिल गायकवाड श्री गजानन मुंडे श्री अनिल रणमळे मोठ्या संख्येने गावातील नागरिक व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते .

## विविध वृत्त...

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा बुलढाणा जिल्हा दौरा

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** राज्याचे मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे हे गुरुवार दि. ३ ऑक्टोबर रोजी बुलढाणा जिल्हा दौऱ्यावर येत आहेत.

त्यांच्या दौऱ्यानुसार सकाळी नऊ वाजता खामगाव येथील श्री सिद्धिविनायक टेक्निकल कॅम्पस अभियांत्रिकी महाविद्यालय हेलिपॅड शिरजगाव निळे, खामगाव येथे आगमन होईल. सकाळी ९:३० वाजता श्री महर्षी वेद व्यास प्रतिष्ठान आळंदी अंतर्गत श्री जगदंबा माता संस्थान घाटपुरी, खामगाव येथील जय जगदंबा वेद विद्यालयाच्या नवीन वास्तु बांधकामाचा भूमिपूजन करतील. श्रीधर महाराज वारकरी भवन घाटपुरी रोड, खामगाव येथे आयोजित कार्यक्रमास उपस्थित राहतील. सकाळी १०:१५ वाजता मोटारीने श्री सिद्धिविनायक टेक्निकल कॅम्पस अभियांत्रिकी महाविद्यालय हेलीपॅड शिरसगाव निळे खामगाव, येथे आगमन व हेलिकॉप्टरने छत्रपती संभाजीनगर विमानतळाकडे प्रयाण करतील.

### रिसोड येथील पिंगलाक्षी देवी नवरात्र उत्सव

दैनिक आपला विदर्भ

■ प्रभाकर पाटील

**रिसोड :** येथील आराध्य दैवत असलेल्या व पांडवकालीन श्री पिंगलाक्षी देवी मंदिरात नवरात्र उत्सव ३ ऑक्टोबर पासून प्रारंभ होत आहे नवरात्र काळात दहा दिवस विविध कार्यक्रमाची रेलचेल राहणार आहे.

३ ऑक्टोबर ला सकाळी ४.३० वाजता मातेचा अभिषेक व घटस्थापना होउन नवरात्र उत्सव प्रारंभ होणार आहे नवरात्र उत्सवाच्या काळात प्रल्हाद महाराज उपासना मंडळाची उपासना, आर्ट ऑफ लिव्हिंग परिवाराचा सत्संग, सुंदरकांड, सप्तशती पाठ व आष्टमीला होमहवन व महाअभिषेक तर नवमीला महाप्रसाद अशा धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे. दसऱ्याला सिमोलांघणानें नवरात्र उत्सवाची सांगता होणार आहे दररोज आरतीची वेळ ही सकाळी ४ . ४५ व संध्याकाळी ६ . ३० असणार आहे कंकरवाडी रोड ते मंदिरा पर्यंतचा रोड निर्माणाधीन असून रस्त्याच्या दोन्ही बाजूच्या कडा भरणे सुरु असल्याने एकाच वेळी दोन चार चाकी गाड्या जाणे शक्य नसल्याने चारचाकी वाहने कंकरवाडी रोड वरती ( दसरा पारकिंग ) पार्क होणार आहेत.

पिंगलसाक्षी देवी तलाव पूर्ण भरला असून मोठया प्रमाणात गाळ उपसा झाल्याने तलावात अथांग पाणी आहे तेंव्हा घाटा वर सकाळी चार वाजता जाण्याचे टाळावे तसेच नवरात्र उत्सवा दरम्यान लहान मुलांची काळजी घ्यावी असे आवाहन संस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

### राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांची सेवाग्राम आश्रमाला भेट; बापूकुटीची पाहणी करुन उपस्थितांशी साधला संवाद



दैनिक आपला विदर्भ

**वर्धा/प्रतिनिधी :** राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती निमित्त महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी दि.२ ऑक्टोबर रोजी वर्धा जवळील सेवाग्राम येथील महात्मा गांधी यांच्या आश्रमाला भेट दिली. यावेळी जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्यासह राज्यपालांनी बापू कुटी, गांधी दफ्तर, पागल दौड आदी निवास व इतर कुटींना भेट दिली तसेच उपस्थितांशी संवाद साधला.

यावेळी आ.डॉ. पंकज भोयर, माजी खा.रामदास तडस व जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, जिल्हा पोलिस अधिक्षक अनुराग जैन यांची उपस्थिती होती. तत्पुवी सेवाग्राम आश्रम प्रतिष्ठानचे सचिव विजय तांबे यांनी राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांचे सुत माळेने स्वागत केले व आश्रमातील दैनंदिन कामकाज व महात्मा गांधीजी यांच्या आश्रमातील वास्तव्याविषयी माहिती राज्यपालांना यावेळी दिली.

### महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांना जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती आज जिल्हाधिकारी कार्यालयात साजरी करण्यात आली. जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी अपर जिल्हाधिकारी सदाशिव शेलार, उपजिल्हाधिकारी सुरेश थोरात, समाधान गायकवाड, अजिंक्य घोडगे, उपविभागीय अधिकारी शरद पाटील, जिल्हा क्रिडा अधिकारी बि. महानकर, नायब तहसीलदार प्रमोद करे, जिल्हा नाझर गजानन मोतेकर, स्विय सहायक रवी लहाने यांच्यासह उपस्थित अधिकारी-कर्मचाऱ्यांनी प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.